# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

---

मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) महाराष्ट्र शासन यांचे निर्देशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद कार्यक्षेत्रातील विद्यापीठ विभाग व महाविद्यालयांतून दिनांक २४-२९ जुलै २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" च्या अनुषंगाने विविध कार्यशाळा, चर्चासत्रे व भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळांमधून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी बाबत जनजागृती करण्यात आली. विद्यापीठ स्तरावरून दिनांक १७.०७.२०२३ तसेच दिनांक २४.०७.२०२३ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह साजरा करण्यासंदर्भात परिपत्रके प्रसिध्द करण्यात आली. विद्यापीठ स्तरावर दिनांक २८/०७/२०२३ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेत सर्व विभागप्रमुख, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षक विद्यार्थी यांच्या उपस्थितीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी के लिये तैयार है हम" या ब्रीदवाक्यासह सर्वसामान्य समुदायाच्या भव्य जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले.

तसेच विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सेंटर फॉर इंटरनॅशनल रिलेशनस्, नवोपक्रम, नवोन्मेष व साहचर्य मंडळ तसेच रसायन तंत्रज्ञान विभाग, प्राणीशास्त्र विभाग, वनस्पतीशास्त्र विभागांमधून सदर कालावधीमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद, सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगाबाद, आदर्श महाविद्यालय, उमरगा, सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगांव इत्यादी महाविद्यालयांमार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सप्ताह उत्साहाने साजरा करण्यात आला.

तसेच सोशल मिडीया वरुन जनजागृती व्हावी या प्रमुख उद्देशाने मा. प्रकुलगुरु व अधिष्ठाता (वाणिज्य व व्यवस्थापन) यांचा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंबंधी विशेष व्हिडिओ प्रकाशित करण्यात आला. यासंदर्भातील विविध अहवाल, छायाचित्रे, वृत्तपत्रांतील बातम्यांचे संकलन आपल्या सुलभ संदर्भासाठी या अहवालासोबत पाठवित आहोत. कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad–431 004, Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Syllbaus : (0240) 2403209 /2403120
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic [Syllabus] Section
कार्यालय :: शैक्षणिक (अभ्यासक्रम) विभाग ::
E-mail: syllabus.unit@bamu.ac.in

संदर्भ क्र./शैक्षणिक (अभ्यासक्रम) विभाग /२०२३-२४/5331-32 दि.१७.०७.२०२३.

**प्रति,**
**विभाग प्रमुख/प्राचार्य,**
**शैक्षणिक विभाग/ सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषयः- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि. २४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत...**

संदर्भः- ०१. शासन निर्णय एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३/शिकाना दि. २० एप्रिल, २०२३ व दि. १६ मे, २०२३.
०२. संचालनालयाचे पत्र क्रमांक-युएनआय/ (१३६/२२)/ विशि-१/ भाग-२/ ८०५६ दि.१३.०७.२०२३.
०३. मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेले आदेश दि. १४.०७.२०२३.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. (१) व (२) अन्वये राज्य शासनाने दिलेल्या निर्देशान्वये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि. २९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करण्याऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्ष पुर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून **राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये दि. २४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याचे योजिले आहे.**

प्रस्तुत दिनांकास आपल्या विभागामध्ये तसेच संलग्नित महाविद्यालय/ स्वायत्त महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात सखोल ज्ञान असलेल्या तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात यावे, तसेच खालील प्रमाणे उपक्रम/ कार्यक्रम घेण्यात यावेत.

१. स्पर्धा - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही संकल्पना घेऊन पध्दतीने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्हिडीओज, रिल्स यासारख्या स्पर्धा आयोजित कराव्यात.
२. जाणीव जागृती - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात ग्रंथालय/ महाविद्यालयामध्ये कार्यशाळा, प्रदर्शन आयोजित करणे, रेडिओ, टेलिव्हीजनच्या माध्यमातून चर्चा, मुलाखती आयोजित करणे, अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिकांच्या संपादकांबरोबर बैठक आयोजित करुन चर्चा घडवून आणणे. युटयुब आणि सोशल मिडियांच्या माध्यमांचा वापर करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे धोरण सर्व संबंधीत घटकांपर्यत पोहोचविणे. तसेच या माध्यमाचा वापर करुन विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे.

--२--

:: ०२ ::

प्रस्तुत प्रकरणी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आयोजित केलेल्या उपक्रमाचा विभागनिहाय अहवाल संचालनालयास खास दूतामार्फत हार्डकॉपीमध्ये दोन प्रतीत दि. ०३ ऑगस्ट, २०२३ पर्यंत पाठवयाचा असल्यामुळे आपण विहीत वेळेत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद कार्यालयास पाठविण्यात यावा, हि विनंती.

करीता, आपल्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे.

आपला विश्वासु,

**सोबत :** वरील प्रमाणे.

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग**

**प्रतिलीपीः**

**मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,** औरंगाबाद विभाग, **औरंगाबाद** यांना माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव सादर.

स्वा/-
**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग**

—=**=—

*DrK*170723/-*

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad–431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Syllbaus : (0240) 2403209 /2403120
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

**स्थापना वर्ष : १९५८**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Syllabus Section
कार्यालय :: अभ्यासक्रम विभाग ::
E-mail: syllabus.unit@bamu.ac.in

संदर्भ क्र./शैक्षणिक (अभ्यासक्रम) विभाग /२०२३-२४/ 6557-58 दि.२४.०७.२०२३.

**प्रति,**

**०१. विभाग प्रमुख,**
**सर्व शैक्षणिक विभाग,**
**(मुख्य व उपपरिसर उस्मानाबाद),**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, **औरंगाबाद.**

**०२. प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषयः- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० च्या प्रभावीपणे अंमलबजावणीस्तव विद्यापीठ विभाग तसेच महाविद्यालयीन स्तरावरुन दि. २४ जुलै ते २९ जुलै, २०२३ च्या दरम्यान उपक्रम राबविणे बाबत...**

संदर्भः- १. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दि. २०.०७.२०२३.
०२. संदर्भ/ शैक्षणिक (अभ्यासक्रम)/ २०२३-२४/ ५३३१-३२ दि. १७.०७.२०२३
०३. मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेले आदेश दि. २०.०७.२०२३.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. (१) अन्वये राज्य शासनाने दिलेल्या निर्देशान्वये **विद्यापीठाअंतर्गत सर्व शैक्षणिक विभागात तसेच संलग्नीत महाविद्यालयांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० च्या प्रभावीपणे अंमलबजावणीस्तव विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात व महाविद्यालयीन स्तरावरुन दि. २४ जुलै ते २९ जुलै, २०२३ च्या दरम्यान सोबत जोडलेल्या पत्रानुसार नमुद केलेले तसेच संदर्भ क्र. (२) अन्वये कार्यालयाने कळविल्यानुसार संबंधीत उपक्रम राबविण्यात यावे** व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

करीता, उपरोक्त प्रमाणे सर्व संबंधीतांनी याची कार्यवाही करण्यात यावी, हि विनंती.

**उपकुलसचिव,**
**शैक्षणिक विभाग**

DR*240723/-

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad–431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Syllbaus : (0240) 2403209 /2403120
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Syllabus Section
कार्यालय :: अभ्यासक्रम विभाग ::
E-mail: syllabus.unit@bamu.ac.in

संदर्भ क्र./शैक्षणिक (अभ्यासक्रम) विभाग /२०२३-२४/ 6925-27 दि.२६.०७.२०२३.

**प्रति,**
**विभाग प्रमुख/अध्यापक /प्राचार्य,**
**सर्व शैक्षणिक विभाग/महाविद्यालये,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**औरंगाबाद.**

**विषयः-राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० च्या प्रभावीपणे अंमलबजावणीस्तव दि. २८ जुलै, २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता जनजागृतीस्तव रॅलीचे आयोजन करणेबाबत...**

संदर्भः- १. विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र व राज्य सरकारनी दिलेले वेळोवेळी आदेश.
२.मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेले आदेश दि. २६.०७.२०२३.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी दिलेल्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र. (१) अन्वये विद्यापीठ अनुदान आयोग, केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशान्वये **विद्यापीठअंतर्गत लागू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० च्या प्रभावीपणे अंमलबजावणीस्तव मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुख/अध्यापक यांनी विद्यापीठ प्रवेशद्वारा जवळ तसेच सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी महाविद्यालयीन स्तरावर दि. २८.०७.२०२३ रोजी सकाळी ठिक १०:३० वाजता वेळेवर "NEP-2020 के लिये है तयार हम!"** हे ब्रिद वाक्य घेवून फोटो, बॅनर, मोबाईलवर डी.पी. यासारख्या Activity करण्याकरीता पूरक साहित्यासह रॅलीचे आयोजन करण्यात यावे, हि विनंती. **प्रस्तुत रॅलीस सर्व विभाग प्रमुख, अध्यापक, महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्य, अध्यापक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

करीता, आपल्या माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे.

**कुलसचिव**

**प्रतिलीपीः**

१. **मा. अध्यक्ष/सदस्य, NEP-Cell विद्यापीठ परिसर व** सर्व जिल्हानिहाय गठीत समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, **औरंगाबाद यांना पुढील योग्यत्या कार्यवाहीस्तव सादर.**
२. **सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, **औरंगाबाद यांना सदर कार्यक्रमास अनिवार्य उपस्थितीस्तव अग्रेषित.**
३. **स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु/ प्र कुलगुरु/ कुलसचिव कार्यालय,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, **औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.**
४. **जनसंपर्क अधिकारी,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, **औरंगाबाद** यांना प्रस्तुत प्रकरणी प्रसिध्दीस्तव सादर.

**कुलसचिव**


भारत रत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०


भारत रत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद
राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०
है तैयार हम |


Azadi Ka Amrit Mahotsav
G20
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद
राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०





लोकमत



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर नवीन शैक्षणिक धोरणाच्या जनजागृती रॅलीत कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# नवे शैक्षणिक धोरण; विद्यापीठाची जागृती रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-कक्ष' (एनईपी सेल) स्थापन करण्यात आला आहे. या सेलच्या माध्यमातून शुक्रवारी सकाळी विद्यापीठ प्रवेशद्वारापासून जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यात कुलगुरू डॉ. प्रमोद येवले व अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

रॅली प्रवेशद्वारापासून विद्यापीठात आली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र. कुलगुरू डॉ. श्याम शिरसाठ, कुलसचिव डॉ. भगवान साखळे, अधिष्ठाता डॉ. भालचंद्र वायकर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. भारती गवळी, डॉ. एन. एन. बंदेला, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. संजय कवडे यांच्यासह प्राध्यापक, अधिकारी तसेच विद्यार्थी सहभागी झाले होते. या धोरणाच्या जिल्हानिहाय अंमलबजावणीसाठी ८ ते १० सदस्यांचा 'टास्क फोर्स' स्थापन केला आहे. बीड जिल्ह्यात प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गट काम करेल. औरंगाबाद जिल्ह्यात डॉ. योगिता होके - पाटील, जालना प्राचार्य डॉ. भारत खंदारे आणि धाराशिवमध्ये डॉ. अंकुश कदम यांची नियुक्ती आहे. फोर्समध्ये व्यवस्थापन परिषद सदस्यांसह अधिसभा, विद्यापरिषद आणि प्राचार्यांचा समावेश आहे.

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 2 Jul 30, 2023
Powered by: erelego.com

**********

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच सेंटर फॉर इंटरनॅशनल रिलेशनस् व नवोपक्रम, नवोन्मेष व साहचर्य मंडळाच्या संयुक्त विद्यमाने

# “Stakeholder Consultation: NEP 2020”


---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे दि. 28 जुलै 2023 रोजी इंटरनल क्वालिटी अॅशुरन्स (IQAC), सेंटर फॉर इंटरनॅशनल रिलेशन्स (CIR) आणि इनोव्हेशन इनक्युबेशन अॅण्ड लिंकेज (IIL) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **‘भागधारकांची धारणा आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020’** या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला यशस्वी करण्या साठी माननीय कुलगुरू येवले सर, रजिस्ट्रार साखळे सर, इनोव्हेशन इनक्युबेशन अॅण्ड लिंकेज (IIL) चे डायरेक्टर प्राध्यापक सचिन देशमुख सर, विज्ञान विद्या शाखे चे प्रमुख प्राध्यापक बी बी वायकर सर आणि आंतरशाखीय विद्या शाखे ची प्रमुख प्राध्यापिका चेतना सोनकांबळे मॅडम यां सर्वांनी सदिच्छा दिली.

चर्चासत्रात शिक्षण क्षेत्रातील अनेक तज्ञ व्यक्तींचा समावेश होता. प्रमुख उपस्थिती मिलिंद कॉलेजच्या प्रा. वैशाली प्रधान, गव्हर्नमेंट कॉलेजचे माजी प्राचार्य रंजन गर्गे आणि संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राच्या महाव्यवस्थापिका प्रा. भाग्यश्री सातदिवे आणि मराठवाडा व्यापारी महासंघ चे सचिव सरदार हरिसिंघजी हे होते. तर अध्यक्षस्थानी इंटरनल क्वालिटी अॅशुरन्स (IQAC) चे डायरेक्टर प्रा. बंदेला होते. कार्यक्रमाचे आयोजन सेंटर फॉर इंटरनॅशनल रिलेशन्सच्या डायरेक्टर प्रा. बीना सेंगर यांनी केले.

चर्चासत्राच्या सुरुवातीला IQAC चे डायरेक्टर प्राध्यापक एन एन बंदेला सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले आणि नवीन शैक्षणीक धोरणामधील संशोधनासाठी विद्यापीठ चे कार्य बद्दल माहिती दिली. कार्यक्रमात चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रा. रंजन गर्गे यांनी आपले मत मांडताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे स्वरुप आराखडा यांच्यावर चर्चा करताना सद्यपरिस्थितीत शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण बदलासहित विद्यार्थी हिताच्या दृष्टीने हे धोरण कसे उपयुक्त ठरेल याची माहिती दिली. प्रा. वैशाली प्रधान यांनी हे नवीन शैक्षणिक धोरण भारताच्या संविधानावर आधारित असावे. यामध्ये कौशल्य विकासाचे स्वरुप अधिक स्पष्ट असावे आणि शिक्षणाचे व्यापारीकरण होता कामा नये असे मत व्यक्त केले. प्रा. भाग्यश्री सातदिवे यांनी चर्चा करताना, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बार्टी, महाज्योती

अश्या संस्थेमार्फत प्रशिक्षणासोबत आर्थिक निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे स्पर्धात्मक परीक्षा आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी हितावह ठरावे असे मत मांडले. सरदार हरिसिंघजी यांनी मराठवाडा व्यापारी महामंडळ यांचे प्रतिनिधी स्वरूपात नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि औधोगिक उपक्रम यांचा मधील विद्यापीठ यांनी कसे सामंजस्य उभे करावे याचा वर त्यांचे मत व्यक्त केले. प्रश्नोत्तरसत्रात संशोधक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी धनश्री , ज्ञानेश्वर हरकळ, राज गवई, प्रविण चिंतोरे इत्यादींनी सहभाग घेतला. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओजस बोरसे, आणि अटळ उष्म्यान केंद्र चे अधिकारी श्री अमित रंजन ,श्री शुभम विसपुते, स्टार्ट उप करणारे युवा सदस्य या सर्वांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे आभार अनिता आढागळे यांनी केले.










SURVIVAL RULES
Pick good co-founders.
Launch fast.
Let your idea evolve.
Understand your users.
Better to make a few users love you than a lot ambivalent.
Offer surprisingly good customer service.
Spend little.
EXECUTIVE SUMMARY
TARGET MARKET
COMPETITORS
VENDORS/SUPPLIERS
will you require outside sources or projects to operate? what about the supplies that you will be using on a regular basis?
MARKETING PLAN
how/will you get your products/services in front of ideal clients? how will you communicate your message?
OPERATIONS
how are you going to run your business? determine the most efficient way to get the job done.


*******

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## Department of Chemical Technology

---

To commemorate the ***"Implementation of NEP 2020 in state of Maharashtra*"**, a NEP 2020 Week is being celebrated from 24th to 29th July 2023 at Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. On dated 27th July 2023, we at Department of Chemical Technology were delighted to organise today a workshop, ***"ACS Publications : Resources For Advancing Impactful Research"*** at Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad. We were fortunate to felicitate the Chief Guest Dr D K Veer, Director, Knowledge Resource Center on the occasion of his superannuation. He expressed his views on the technological changes in Knowledge Resource management. Dr Nikita Wanjari, Relationship Manager and Science communicator at Balani Infotech Pvt. Ltd. Conducted the workshop along with Mr Anurag Verma on the Impactful Publications in American Chemical Society Publications.

We were delighted to Welcome Dr. Surendra Thakur, Joint Director (Higher Education, Aurangabad), Prof. Dr. N. N. Bandela (Director IQAC), Prof. Dr. Bhalchandra Waykar (Dean, Science and Technology) along with Dr. Sanjay Kawde, (Deputy Registrar Academic Section) on the occasion of celebration of 'NEP 2020 Week'.

All the speakers expressed well on 'NEP and resources for advancing impactful research'. Prof. Vivek Rathod, Co-ordinator of the Program along with Dr. Sachin Bhusari, Dr Aniket Sarkate, Prof. Kallawar and students of Undergraduate Program, Post-graduate Program and Doctoral fellows of the department were present on the occasion.


RSVP
Prof. V. D. Rathod
Dr. Dharmraj Veer
Dr. Nikita Wanjari





**********

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad
## Department of Zoology

---

A brainstorming session on Implementation of NEP-2020 was organized at the Department of Zoology on 27/07/2023 at 3.00 PM. For this session Prof. Dr. Satish Patil, Department of Environmental Science, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad and Prof. Radhakrisha Pandit, Department of Zoology, Savitribai Phule Phune University, Pune were invited. The program was chaired by Prof. Dr. Bhalchandra Waykar (Dean, Science and Technology, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad). Prof. Dr. G. D. Khedkar was the convenor for the programme. Prof. E. R. Martin, Professor & Head Department of Zoology welcome all the guests and participants and had expressed brief note about the brainstorming session.

Prof. Dr. Satish Patil has delivered a highly informative session on issues in implementing NEP 2020 and its solutions. Prof. Patil has given several examples on how to frame syllabus, credits and examination pattern. He has also emphasized student demand and making students compatible to meet the industry demand and global competition. Prof. Patil highlighted several issues and has suggested strategies for resolving it. He has provoked the audience to participate in the discussions.

In the second lecture Prof. Pandit highlighted on imbibing syllabus with due considerations on innovation. Such syllabus will improve the innovation atmosphere for developing future innovators. Prof. Pandit has shared his experience and practices prevailed in Savitribai Phule Pune University, Pune. Prof. Dr. B. B. Waykar has explained the idea of NEP and its structure in brief.

After both lectures, there was almost an hour's time spent on discussion.

Several Head of the departments, faculty members, Ph.D. Scholars and PG students participated in the programme.

Session was concluded by the vote of thanks by Prof. Dr. Sunita Borde.

RDS

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
प्राणिशास्त्र विभाग
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

डॉ. आर. जी. मार्टीन :
एम. एस्सी. पीएच.डी. :
प्राध्यापक व विभागप्रमुख :

ऑफिस नंबर : ०२४०-२४०३३९३
फॅक्स : ०२४०-२४०३३९३
मोबाईल नंबर : ९४२०३४५०२०

दिनांक : २७/०७/२०२३

# सूचना

सर्व प्राध्यापकांना व विद्यार्थीना कळविण्यात येते कि प्राध्यापक डॉ. आर. एस. पंडित विद्यापीठ पुणे यांचे आपल्या विभागामध्ये दिनांक २७/०७/२०२३ रोजी ठीक दुपारी ०३:०० वाजेला व्याख्यान आयोजित केलेले आहे. तरी सर्वांनी उपस्तीत राहावे.

Mali

विभाग प्रमुख


Prof. & Head
DEPT. OF ZOOLOGY
Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad.


NEW EDUCATION POLICY-2020
AND SKILLING

*************

# श्री सिध्देश्वर महाविद्यालय, माजलगाव जि. बीड



मराठवाडा साथी

# माजलगावात सिद्धेश्वर महाविद्यालयाची एन.ई.पी.च्या जनजागरणासाठी रॅली



**माजलगाव/प्रतिनिधी :**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या वतीने एन.ई.पी.(NEP) सेल व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या जनजागरणासाठी जनजागरण रॅली सिध्देश्वर कॉलेज ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आली. नुकतेच केंद्र शासनाने संपूर्ण देशभरामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये देखील याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार आहे. या संदर्भाने महाविद्यालयात, समाजामध्ये व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती व रुपरेषा कळावी यासाठी महाविद्यालयात भितीपत्रकाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या बाबतीत महाविद्यालयात सप्ताह भरामध्ये वेगवेगळ्या विषयावर संवाद व चर्चासत्र देखील आयोजित केले जाणार आहेत.

(पान 7 वर..)

BEED Edition
Jul 29, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

## ...माजलगावात सिद्धेश्वर

विद्यार्थ्यांच्या मनामधील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा बद्दलची भीती जावी तसेच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी ची जाणीव जागृती व्हावी म्हणून या रॅली शहरातून काढण्यात आली. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सहकार्य केले.

कुणाल दुगड.
पत्रकार तथा माजलगाव तालुका प्रतिनिधी, दै.मराठवाडा साथी
माजलगाव.8275942363

*********

# सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगाबाद

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुषंगाने पद्व्यत्तर शिक्षणाची अंमलबजावणी याविषयावर एक दिवसीय मागदर्शक कार्यशाळा दिनांक २८/०७/२०२३ रोजी सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगाबाद येथे संपन्न झाली. सदरील कार्यशाळेत प्रा. डॉ. भालचंद्र वायकर (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान) यांनी मार्गदर्शन केले. सदरील कार्यशाळेत मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.







2023/7/28 15:57


2023/7/28 15:24

**************

# कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद जि. औरंगाबाद

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०" याविषयावर एक दिवसीय कार्यशाळा दिनांक २४/०७/२०२३ रोजी कोहिनूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खुलताबाद जि. औरंगाबाद येथे संपन्न झाली. सदरील कार्यशाळेत प्रा. डॉ. भालचंद्र वायकर (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान) यांनी मार्गदर्शन केले. सदरील कार्यशाळेस प्राचार्य डॉ. शंकर अंभोरे, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवृंद यांची प्रमुख उपस्थिती होती.

LOKMAT TIMES

KHULDABAD

## One-day workshop on NEP at Kohinoor College




Kohinoor College principal Dr Shankar Ambhore felicitates Dr Bhalchandra Waykar, the Dean of Science and Technology (BAMU), during the one-day workshop on Monday.

A one-day workshop to discuss the National Education Policy (NEP) 2020 was held here at Kohinoor College of Arts, Commerce and Science on Monday. The workshop was organised under the guidance of Kohinoor Education Society president Adv (Dr) Mohammed Mazhar Khan and secretary Asma Khan.

Dean of Science and Technology (Bamu) Dr Bhalchandra Waykar was the chief guest and speaker for the workshop.

The workshop was presided over by principal of the college Dr Shankar Ambhore. Dr Waykar asserted that along with the three basic needs food, clothing, and shelter, quality education has also become a basic human need. The new educational policy and comprehensive aspects of research, innovation, and development have been considered priorities for the creation of a self-reliant India.

Principal Dr Ambhore in his presidential address that this policy is useful for the comprehensive and multifaceted personality development of students and that inculcating social and moral values is possible through this educational policy. He added further that this educational policy is student-centric.

NEP policy voordinator of the college Dr Ishwar Ghorude delivered an introductory speech, while Dr Ganesh Akat introduced the chief guest. Vice principals of the college Dr Madhukar Hiwale, Dr Rafiullah Khan were also present on the stage.

Dr Vaishali Ajane proposed a vote of thanks. Principals, teachers from various colleges in the tehsil and staff members and students of Kohinoor College were present.

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 13 Jul 25, 2023
Powered by: erelego.com

## قومی تعلیمی پالیسی 2020 کے پیش نظر ڈاکٹر بابا صاحب امبیڈکر مراٹھوڑہ یونیورسٹی کے

# دائرہ اختیار میں پہلی ورکشاپ کوہ نور کالج میں منعقد



خلدآباد: قومی تعلیمی پالیسی 2020 کے پیش نظر ڈاکٹر بابا صاحب امبیڈکر مراٹھوڑہ یونیورسٹی کے دائرہ اختیار میں پہلی ایک روزہ ورکشاپ پیر کو کوہ نور کالج آف آرٹس، کامرس اینڈ سائنس میں منعقد ہوئی۔ یہ ورکشاپ کوہ نور ایجوکیشن سوسائٹی کے صدر ایڈوکیٹ (ڈاکٹر) محمد مظہر خان اور سیکریٹری اسماء خان صاحبہ کی رہنمائی و رہبری میں منعقد کی گئی تھی۔ ڈاکٹر بھالچندر وانکھیڑے، ڈین سائنس اور ٹیکنالوجی، ڈاکٹر بابا صاحب امبیڈکر مراٹھوڑہ یونیورسٹی، اورنگ آباد ورکشاپ کے مہمان خصوصی اور مقرر تھے جبکہ ورکشاپ کی صدارت کالج کے پرنسپل پروفیسر ڈاکٹر شنکر امبھورے نے کی۔ ڈاکٹر وانکھیڑے نے قومی تعلیمی پالیسی 2020 کا تفصیلی جائزہ لیتے ہوئے کہا کہ تین بنیادی ضروریات خوراک، لباس اور پناہ گاہ کے ساتھ ساتھ معیاری تعلیم بھی انسانوں کی بنیادی ضرورت ہے۔ اور اس تعلیمی پالیسی میں خود انحصار ہندوستان کی تشکیل کے لیے تحقیق، اختراع اور ترقی کے جامع پہلوؤں کو ترجیح دی گئی ہے۔ اس کے علاوہ یہ تعلیمی پالیسی طلبہ پر مبنی ہے اور طلبہ کے لیے ٹیکنالوجی کو استعمال کرتے ہوئے اپنی صلاحیتوں کو نکھارنے کے مواقع فراہم کرتا ہے۔ یہ تعلیمی پالیسی ڈاکٹر بابا صاحب امبیڈکر کی فکر پر مبنی معاشرے کی ترقی کے لیے ضروری ہے اور اس قومی تعلیمی پالیسی کے کامیاب نفاذ کے لیے طلبہ، اساتذہ، پرنسپل اور والدین کی شرکت بہت ضروری ہے۔ ورکشاپ کے چیئرمین پرنسپل پروفیسر ڈاکٹر شنکر امبھورسر نے اپنے صدارتی خطاب میں قومی تعلیمی پالیسی 2020 کے موضوع پر تفصیلی رہنمائی کرتے ہوئے کہا کہ یہ پالیسی طلبہ کی ہمہ جہت اور ہمہ جہتی شخصیت کی نشوونما کے لیے مفید ہے اور اس تعلیمی پالیسی کے ذریعے سماجی اور اخلاقی اقدار کو فروغ دینا ممکن ہے اور اس بات پر زور دیا گیا کہ تمام تر تعلیمی پالیسی طلبہ کے لیے مفید ہے۔ ورکشاپ کا تعارف کالج کے نیشنل ایجوکیشن پالیسی کوآرڈینیٹر ڈاکٹر اتیشور گھوروڑے نے پیش کیا۔ جبکہ ڈاکٹر گنیش آکات نے مہمان خصوصی کا تعارف پیش کیا۔ کالج کے نائب پرنسپل ڈاکٹر مدھوکر ہیولے، ڈاکٹر رفیع اللہ خان اسٹیج پر موجود تھے۔ ڈاکٹر سید عرفان نے پروگرام کی نظامت کے فرائض انجام دیے جبکہ ڈاکٹر وشالی اجنے نے اظہار تشکر ادا کیا۔ اس موقع پر خلدآباد تحصیل کے مختلف کالجوں کے پرنسپل، اساتذہ اور کوہ نور کالج کے پروفیسرس دیگر عملے کے ارکان اور طلباء کثیر تعداد میں موجود تھے۔

**********

# आदर्श महाविद्यालय, औरंगाबाद

धाराशिव जिल्हा 29-07-2023



नवी आशा • मराठी भाषा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांचे मार्फत निबंध स्पर्धा

## शैक्षणिक धोरणाच्या जनजागृतीसाठी जिल्हयामध्ये ठिकठिकाणी रॅली

### एनसीसीचा सहभाग, नव्या धोरणासाठी तयार असल्याच्या रॅलीत घोषणा



उमरगा आदर्श महाविद्यालयात जनजागृती फेरी काढण्यात आली.



भाऊसाहेब बिराजदार महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेली रॅली.

प्रतिनिधी | उमरगा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अमलबजावणीसाठी शुक्रवारी (दि २८) सकाळी आदर्श महाविद्यालयाच्यावतीने जनजागृती फेरी काढण्यात आली. फेरीला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शासनाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४ पासून सर्वत्र नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सुरू करण्यात येत आहे. या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी जनजागृती होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु व कुलसचिव यांनी सूचित केल्या प्रमाणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या वतीने सकाळी साडेदहा वाजता एन ई पी २०२० के लिए है तयार हम ! घोषणा देत जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. दिलीप गरूड, उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजन कार्यक्रमाधिकारी प्रा दत्ता भुजबळ, प्रा शरद कुलकर्णी यासह प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जनजागृती रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**छत्रपती शिवाजी महाविद्यालय**

शहरातील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी दि.२८ रोजी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी विभागाच्या वतीने हे आयोजन होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एच जाधव, उपप्राचार्य व्ही. एस इंगळे, डॉ.पी. ए पिटले, डॉ. डी व्ही माने , कॅप्टन डॉ. डी .एस चिट्टमपल्ले , डॉ. जी. एन सोमवंशी , उपस्थित होते.या डॉ.पी. ए. पिटले यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण सर्वांसाठी किती उपयुक्त आहे याबद्दल संपूर्ण माहिती दिली. रॅलीच्या यशस्वीतेसाठी एनसीसी, विभाग व एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात जनजागृती रॅली**

तालुक्यातील बलसूर येथील भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २८) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जनजागृती रॅली काढण्यात आली. तालुक्यातील बलसूर येथील भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने या जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्या डॉ. स्वाती यादव, डॉ. मनिषा नागिले, डॉ. एस. एस. गायकवाड, प्रा. चौरे, प्रा. एल. के. मनशेट्टी, डी. एस. जाधव, विशाल पाटील यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते

### निबंध स्पर्धेचेही आयोजन

मराठी भाषा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' चा जागृती सप्ताह २४ ते२९ जुलै दरम्यान साजरा करण्यात आला. त्याचा एक भाग म्हणून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या निबंध स्पर्धेचे विषय 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भरडधान्यातील आहार विज्ञान' यांना अनुसरुन ठेवण्यात आले होते. या स्पर्धेत ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या निबंध स्पर्धेत गार्गी कुलकर्णी प्रथम, वेदांत देशपांडे यास द्वितीय तर वामन जाधव व अथर्व इगवे यांनी तृतीय क्रमांक मिळविले. विजेत्यांना प्राचार्य डॉ दिलीप गरुड यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. उपक्रमाचे संयोजन उपप्राचार्य डॉ सुरेश कुलकर्णी यांनी केले. स्पर्धेचे संयोजन डॉ लक्ष्मण बिराजदार, डॉ सुधिर मठपती, प्रा अंकुश टाकळे यांनी केले सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले.

दिव्य मराठी

धाराशिव जिल्हा 29-07-2023

**दिव्य मराठी विशेष** • शिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि सर्वांना समान संधी मिळणार असल्याचे प्रतिपादन

# नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या आवडीप्रमाणे

प्रतिनिधी | उमरगा

शैक्षणिक धोरणात बदलत्या काळाप्रमाणे शासनाने पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४पासून सुरूवात होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यावर आधारित असलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात स्वयंरोजगाराला चालना मिळणार आहे. पारंपारिक उच्च शिक्षण पद्धतीत बदल घडवून नवीन शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद अध्यक्ष प्रा. डॉ. अंकुश कदम यांनी सांगितले.



आदर्श महाविद्यालयात बोलताना डॉ अंकुश कदम.

शहरातील आदर्श महाविद्याल याच्यावतीन नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी जागृती सप्ताहनिमित्त गुरूवारी (२७) आयोजित कार्यक्रमात डॉ कदम बोलत होते. प्राचार्य डॉ दिलीप गरूड अध्यक्षस्थानी होते. व्यवस्थापन परिषदेचे प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. सतीश गावीत, उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी, डॉ. सुधीर मठपती आदी उपस्थित होता. प्राचार्य डॉ गरूड यांनी या नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षणाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी मोठी मदत होणार आहे. देशातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी मिळणार आहे. शैक्षणिक धोरण हे आवाहनात्मक असणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणातील नवनवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थी व पालक यांनी पुढे येण्याची गरज आहे.उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. बालाजी मोरे यांनी आभार मानले.

प्रा. डॉ. कदम पुढे बोलताना म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षण पध्दती विद्यार्थ्यांच्या आवडी प्रमाणे असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळणार आहे. या शैक्षणिक धोरणामुळे बेरोजगारीवर मात करणे शक्य होईल. शैक्षणिक धोरणात अपेक्षित बदल सुचवण्यासाठी विद्यार्थी-पालकांनी पुढे येण्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी साठी सज्ज व्हा असे आवाहन केले. यावेळी डॉ मठपती म्हणाले,नवीन शैक्षणिक धोरणाची आखणीही बदलत्या समाज व्यवस्थेवर आधारित असल्याने शैक्षणिक धोरणाचा विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाची सामाजिक व शैक्षणिक गरज, नवीन शैक्षणिक धोरणाची निर्मिती, नवीन शैक्षणिक धोरणाची उपयुक्तता अंमलबजावणीची आवश्यकता यावर मार्गदर्शन केले.

**********